
SAMPLE CONTENT

Perfect

# राज्यशास्त्र

## इयत्ता अकरावी (कला)

लोकशाहीमध्ये नागरिकांना काही हक्क आणि कर्तव्ये असतात. संबंधित देशाच्या संविधानात आणि शासनाच्या कायद्यात ती नमूद केलेली असतात.




मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

सुरभी जोशी
M.A. (Economics)



Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे निर्धारित अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित.

PERFECT

# राज्यशास्त्र

## इयत्ता अकरावी (कला)

### ठळक वैशिष्ट्ये

- अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित
- 'पाठाची रूपरेषा' शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा
- संपूर्ण पाठ प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात
- विविध प्रश्नप्रकारांचा समावेश
- आशयासंबंधित अधिकची माहिती आवश्यकतेनुसार Q. R. Code द्वारे उपलब्ध
- 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत संकल्पनांची सुस्पष्टता
- 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत अधिकची रुचिपूर्ण माहिती
- 'ज्ञानाचे उपयोजन' अंतर्गत पाठांतर्गत प्रश्नोत्तरांचा समावेश
- स्वयंमूल्यमापनाकरता पाठाच्या शेवटी सराव चाचणी (उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध)

Quill-The Padhai App डाउनलोड करण्यासाठी सोबत दिलेला Q. R. Code स्कॅन करा.
Quill App मध्ये PK-FYJCPOLSCIMM ही प्रॉडक्ट की वापरून तुम्ही ह्या पुस्तकाचे e-book ३० दिवसांपर्यंत मोफत वापरू शकता आणि डिजिटल लर्निंगचा अनुभव घेऊ शकता.

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

TEID: 2289

P.O. No. 3838

## प्रस्तावना

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, इयत्ता नववी व दहावीमध्ये इतिहास विषयाच्या जोडीने अभ्यासलेला राज्यशास्त्र हा विषय इयत्ता अकरावीमध्ये स्वतंत्रपणे अभ्यासत आहात. यामध्ये राज्यशास्त्रातील राज्य, लोकप्रशासन, आंतरराष्ट्रीय सहकार्य व आंतरराष्ट्रवाद या मूलभूत संकल्पना भारतासंदर्भात अभ्यासणार आहात. पाठ्यपुस्तकातील या आशयाचे विश्लेषण करून विषयाची व्यापकता लक्षात घेत तयार केलेले **टार्गेट प्रकाशनाचे Perfect राज्यशास्त्र: इयत्ता अकरावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

पाठाच्या सुरुवातीला 'पाठाची रूपरेषा' शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा देण्यात आला आहे. पुस्तकातील प्रत्येक पाठात स्वाध्यायांतर्गत व पाठांतर्गत विचारलेल्या सर्व प्रश्नांचा, तसेच सरावाच्या दृष्टीने अधिकच्या प्रश्नांचा समावेश केला आहे. परीक्षेच्या दृष्टीने उत्तरांची मांडणी मुद्द्यांच्या स्वरूपात करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार पाठांतर्गत प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत. उपक्रमही सोडवण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त काही ठिकाणी 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत संबंधित आशय व संकल्पना सुस्पष्ट केल्या आहेत. तसेच, आवश्यकतेनुसार आशयासंबंधितची अधिकची माहिती Q. R. Code द्वारे दिली आहे. त्याचप्रमाणे 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत आशयासंबंधी अभिरुचिपूर्ण माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, स्वयंमूल्यमापनाकरता प्रत्येक पाठाच्या शेवटी सराव चाचणी देण्यात आली आहे आणि त्याची उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया नेहमीच स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'राज्यशास्त्र : पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# वैशिष्ट्ये

**पाठाची रूपरेषा**

प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला पाठाचा थोडक्यात आढावा घेण्याकरता 'पाठाची रूपरेषा' देण्यात आली आहे.

**विविध प्रश्नप्रकार**

प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार स्वाध्यायांतर्गत विचारलेल्या विविध प्रश्नप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

आशयाच्या सुस्पष्टतेकरता 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत संकल्पना स्पष्ट केली आहे.

**ज्ञानगुरू**

ज्ञानगुरू शीर्षकांतर्गत आशयासंबंधित रुचिपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

**Q. R. Code**

अभ्यास अधिक रुचिपूर्ण व्हावा यादृष्टीने आवश्यकतेनुसार आशयासंबंधित माहिती व व्हिडिओ, तसेच सराव चाचणीच्या उत्तरांची पडताळणी करण्यासाठी उत्तरे Q. R. Code द्वारे पुरवण्यात आली आहेत.

**ज्ञानाचे उपयोजन व उपक्रम**

ज्ञानाचे उपयोजनमधील पाठांतर्गत सर्व प्रश्नांची आवश्यकतेनुसार उत्तरे देण्यात आली आहेत. तसेच उपक्रम सोडवून दिले आहेत.

**सराव चाचणी**

विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापन करता यावे यासाठी पाठाच्या शेवटी सराव चाचणी दिली आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | राज्य | १ |
| २. | स्वातंत्र्य आणि हक्क | १० |
| ३. | समता आणि न्याय | २३ |
| ४. | संविधानिक शासन | ३४ |
| ५. | प्रतिनिधित्वाची संकल्पना | ४८ |
| ६. | न्यायमंडळाची भूमिका | ५९ |
| ७. | लोकप्रशासन | ७० |
| ८. | विकास प्रशासन | ८२ |
| ९. | १९४५ नंतरचे जग - I | ९३ |
| १०. | १९४५ नंतरचे जग - II | १०४ |


**टीप:** १. पाठाखालील स्वाध्यायांतर्गत दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.
२. पाठामध्ये चौकटीत दिलेल्या आशयासंबंधित प्रश्न # या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

# १ राज्य

## पाठाची रूपरेषा

| | |
|---|---|
| **राष्ट्र** | १. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीवर स्वत:ची समान ओळख असणारे लोक आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्याला 'राष्ट्र' असे म्हणतात.<br>२. राष्ट्र म्हणजेच इंग्रजीमध्ये Nation या शब्दाचे मूळ लॅटिनमधील Nasci या शब्दात आहे, ज्याचा अर्थ 'जन्माला येणे' असा आहे.<br>३. सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक इत्यादी पातळींवर भावनिक एकात्मतेची जाणीव असलेली ही संकल्पना आहे.<br>४. राष्ट्राची वैशिष्ट्ये:<br>i. लोकसंख्या: राष्ट्राची लोकसंख्या असणे आवश्यक असते. लोकसंख्येत असलेले साम्य त्यांना गट म्हणून एकत्र करते.<br>ii. सामुदायिक ऐक्याची भावना: लोकांमधील सांस्कृतिक समानतेतून, आपण एक असल्याची मानसिकता निर्माण होते.<br>iii. राजकीय वेगळेपण: विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांमधील काही बाबींमध्ये असलेल्या समानतेमधून राजकीयदृष्ट्या वेगळे होण्याची भावना निर्माण होते. स्वयंनिर्णयाच्या जाणीवेतून राजकीय पातळीवर स्वशासनाची मागणी निर्माण होऊ शकते. |
| **राष्ट्रवाद** | १. राष्ट्रवाद ही एक प्रकारची राजकीय अस्मिता आणि ते आपल्या राष्ट्रावरचे प्रेम असते.<br>२. ही लोकांना देशाप्रति राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती आहे.<br>३. राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये:<br>i. राष्ट्रवाद ही एकता निर्माण करू शकणारी, तसेच एखाद्या गोष्टीचा नाश करू शकणारी शक्ती आहे. त्याचे प्रागतिक राष्ट्रवाद व आक्रमक राष्ट्रवाद असे वर्णन केले जाते.<br>ii. राष्ट्रवाद हा साम्राज्यवाद किंवा वसाहतवादाला विरोध करतो. तो स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार करतो.<br>iii. राष्ट्रवाद विविधतेला प्रोत्साहन देऊ शकतो.<br>४. राष्ट्रवादाचे प्रकार:<br>i. उदारमतवादी राष्ट्रवाद: हा राष्ट्रवाद राष्ट्र आणि सार्वभौमत्वाची सांगड घालतो.<br>ii. परंपरावादी राष्ट्रवाद: हा राष्ट्रवाद स्वदेशाभिमानाला महत्त्व देतो.<br>iii. प्रसारवादी राष्ट्रवाद: हा आक्रमक स्वरूपाचा राष्ट्रवाद आहे.<br>iv. वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद: हा राष्ट्रवाद राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात बघितला जातो. |
| **राज्य** | १. राज्य ही सर्वसामान्य जनतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केली गेलेली राजकीय संघटना आहे.<br>२. राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काचा आग्रह हा एखाद्या राष्ट्राला राज्याच्या दिशेने घेऊन जातो.<br>३. एखादे राष्ट्र राज्य बनण्यासाठी पुढील वैशिष्ट्ये आवश्यक असतात:<br>i. सार्वभौमत्व: देशाचे स्वत:चे अधिकार (स्वत:चे संविधान)<br>ii. स्वतंत्र शासनव्यवस्था: सार्वभौम सरकार<br>iii. विशिष्ट भूप्रदेश: विशिष्ट भौगोलिक सीमा<br>iv. लोकसंख्या: विविधता असलेले लोकांचे अस्तित्व |
| **राज्य आणि शासनसंस्था** | १. 'राज्य' आणि 'शासनव्यवस्था' या दोन्ही संज्ञा एकमेकांपेक्षा भिन्न आहेत.<br>२. राज्य ही एक राजकीय संघटना आहे, तर शासनसंस्था राज्याची प्रतिनिधी असते. राज्याचा जो संकल्प आहे त्याला आकार देणे, तो व्यक्त करणे आणि प्रत्यक्षात आणण्याचे कार्य शासन करते. |

Sample Content

३. शासनसंस्था हा राज्याचा प्रमुख घटक आहे.
४. शासनव्यवस्थेची तीन अंग आहेत: कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ.
५. राज्य ही अमूर्त स्वरूपाची संकल्पना आहे, तर शासनसंस्था मूर्त स्वरूपाची संकल्पना असते.
६. राज्य हे कायमस्वरूपी असते, तर शासनसंस्था निश्चित कालावधीसाठी असते.
७. राज्य हे राजकीयदृष्ट्या तटस्थ असते, तर शासनसंस्थेला विचारप्रणालीवर आधारित अजेंडा असतो.
८. राज्याच्या अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी शासनसंस्था करते.

**प्र.१.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. महाराष्ट्रीय ही व्यक्तीची ओळख _______ म्हणून आहे. (राष्ट्रीयत्व, प्रादेशिक ओळख, सांस्कृतिक ओळख, वांशिकता)

२. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अमेरिकन म्हणून संबोधले जाते, तेव्हा आपण त्याच्या _______ बद्दल बोलतो. (राष्ट्रीयत्वा, प्रादेशिक ओळखी, सांस्कृतिक ओळखी, वांशिकते)

#३. राज्यशास्त्रात स्वतंत्र सार्वभौम देशासाठी '_______' ही संज्ञा वापरली जाते. (राष्ट्र, देश, राज्य, शासन)

*४. इंग्रजीतील Nation हा शब्द लॅटिन शब्द _______ पासून निर्माण झाला आहे. (Nasci, Natio, Natalis, Nauto)

#५. Nasci म्हणजे _______. (राष्ट्रवादी असणे, जन्म घेणे, समान वांशिकता असणे, समान भाषा असणे)

६. राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहणे हे _______ चे उदाहरण आहे. (सांस्कृतिक मूल्या, नागरी कर्तव्या, राजकीय एकते, राष्ट्रवादा)

*७. उदारमतवादी राष्ट्रवादाचा उगम हा _______ राज्यक्रांतीत झाला. (अमेरिकन, रशियन, फ्रेंच, ब्रिटिश)

८. 'चौदा मुद्द्यांचे' भाषण _______ यांनी दिले. (वुड्रो विल्सन, ॲरिस्टॉटल, जाँ बोडीन, हॅरॉल्ड लास्की)

९. _______ राष्ट्रवाद स्वदेशाभिमानाला खूप महत्त्व देतो. (उदारमतवादी, परंपरावादी, प्रसारवादी, वसाहतवादविरोधी)

१०. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यादरम्यान भारताने _______ राष्ट्रवादाचा अनुभव घेतला आहे. (उदारमतवादी, परंपरावादी, प्रसारवादी, वसाहतवादविरोधी)

११. सार्वभौमत्वाची मागणी म्हणजे _______ हक्काची मागणी होय. (मत, राष्ट्रीयत्व, स्वयंनिर्णय, राष्ट्रवाद)

१२. राज्य ही एक लोकांच्या सामान्य गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेली _______ संस्था आहे. (राजकीय, सामाजिक, आर्थिक, परोपकारी)

१३. राज्याचा जो काही संकल्प आहे, त्याला आकार देणे, व्यक्त करणे आणि तो प्रत्यक्षात आणण्याचे कार्य राज्याचा प्रतिनिधी म्हणून _______ करते. (राष्ट्र, शासन, राज्य, खासगी संस्था)

१४. शासनसंस्थांची _______ अंग असतात. (पाच, चार, तीन, सहा)

१५. राज्य हे राजकीयदृष्ट्या _______ असते. (तटस्थ, पक्षपाती, सार्वभौम, ठोस)

**उत्तरे:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रादेशिक ओळख | २. | राष्ट्रीयत्वा |
| ३. | राज्य | ४. | Nasci |
| ५. | जन्म घेणे | ६. | राष्ट्रवादा |
| ७. | फ्रेंच | ८. | वुड्रो विल्सन |
| ९. | परंपरावादी | १०. | वसाहतवादविरोधी |
| ११. | स्वयंनिर्णय | १२. | राजकीय |
| १३. | शासन | १४. | तीन |
| १५. | तटस्थ | | |

**प्र.१. (ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. याचा रोख राज्य, सरकार आणि प्रशासनावर असतो.

२. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीवर स्वत:ची समान ओळख असणाऱ्या व आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांचा गट.

*३. लोकांना देशाशी राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती.

४. समाजाला एकत्रित करून विकास साध्य करण्याची क्षमता असलेला राष्ट्रवाद.

#५. जगात चिरकालीन शांतता आणि स्थैर्य निर्माण व्हावे यासाठी अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी याची मांडणी केली.

६. वसाहतवाद हे या राष्ट्रवादाचे एक उदाहरण आहे.

७. राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भातील राष्ट्रवाद.

Sample Content

८. राष्ट्राला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार या अर्थाची संज्ञा.

#९. अमेरिकेचे अठ्ठाविसावे राष्ट्राध्यक्ष.

१०. राज्याच्या नावे कार्य करण्याची अधिमान्यता जबाबदारी असलेल्या संस्था.

११. राज्याच्या सीमेंतर्गत असलेला भौगोलिक प्रदेश.

*१२. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे.

#१३. पॅलेस्टाईनच्या जनतेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून मान्यता असलेली संघटना.

१४. राज्याचा मुख्य घटक ज्याद्वारे ते त्याची कार्ये करते.

**उत्तरे:**

१. राज्यशास्त्र
२. राष्ट्र
३. राष्ट्रवाद
४. प्रागतिक राष्ट्रवाद
५. चौदा मुद्दे
६. प्रसारवादी राष्ट्रवाद
७. वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद
८. सार्वभौमत्व
९. वुड्रो विल्सन
१०. सार्वजनिक संस्था
११. भूप्रदेश
१२. अधिकार क्षेत्र
१३. पॅलेस्टाईन मुक्ती संघटना (PLO)
१४. शासन

## प्र.१. (क) गटात न बसणारा शब्द ओळखा.

**[टीप:** उत्तरातील शब्दापुढील स्पष्टीकरण केवळ आकलनाकरता दिले आहे.**]**

१. उदारमतवादी, वसाहतवादविरोधी, प्रसारवादी, वसाहतवादी.

२. सार्वभौमत्व, लोकशाही, शासन, भूप्रदेश.

३. कार्यकारी, कायदेमंडळ, खाजगी व्यवसाय, न्यायमंडळ.

**उत्तरे:**

१. वसाहतवादी – राष्ट्रवादाचा प्रकार नाही.

२. लोकशाही – राज्याचा घटक नाही.

३. खासगी व्यवसाय – सरकारचे अंग नाही.

## प्र.१. (ड) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

१.

| | | |
|---|---|---|
| i. | उदारमतवादी राष्ट्रवाद | स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचा अधिकार |
| ii. | परंपरावादी राष्ट्रवाद | देशभक्तीला महत्त्व |
| iii. | प्रसारवादी राष्ट्रवाद | राष्ट्रवादाचे प्रागतिक स्वरूप |
| iv. | वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद | स्वातंत्र्यलढा |

*२.

| | | |
|---|---|---|
| i. | ॲरिस्टॉटल | जर्मन विचारवंत |
| ii. | जाँ बोडीन | फ्रेंच विचारवंत |
| iii. | वुड्रो विल्सन | अमेरिकन विचारवंत |
| iv. | हॅरॉल्ड लास्की | ब्रिटिश विचारवंत |


**उत्तरे:**

१. **चुकीची जोडी:** प्रसारवादी राष्ट्रवाद – राष्ट्रवादाचे प्रागतिक स्वरूप
**बरोबर जोडी:** प्रसारवादी राष्ट्रवाद – राष्ट्रवादाचे आक्रमक स्वरूप


२. **चुकीची जोडी:** ॲरिस्टॉटल – जर्मन विचारवंत
**बरोबर जोडी:** ॲरिस्टॉटल – ग्रीक विचारवंत

## प्र.२. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.

१.




२.




**उत्तरे:**

१. i. उदारमतवादी ii. परंपरावादी
iii. वसाहतवादविरोधी iv. प्रसारवादी

२. i. सार्वभौमत्व ii. शासन
iii. भूप्रदेश iv. लोकसंख्या

## प्र.३. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

#१. **‘राष्ट्र’ व ‘राज्य’ या दोन्ही शब्दांचा अर्थ एकसारखाच आहे.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. मानसिक पातळीवर ऐक्याची भावना व सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक, भाषिक, ऐतिहासिक पातळीवर समानतेच्या संदर्भात ‘राष्ट्र’ हा शब्द वापरला जातो.

ii. सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनसंस्था, निश्चित भूप्रदेश आणि लोकसंख्या हे घटक असतील, तर एखादे राष्ट्र राज्य बनते.

याचाच अर्थ, ‘राष्ट्र’ व ‘राज्य’ या शब्दांचा अर्थ भिन्न आहे.

Sample Content

*२. **प्रागतिक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. राष्ट्रवाद ही एकता निर्माण करू शकणारी, तसेच प्रगती करू शकणारी अथवा विनाश करू शकणारी शक्ती आहे. जिचे स्वरूप प्रागतिक किंवा आक्रमक असते.

ii. समाजाला एकत्रित करून विकास साध्य करण्याची क्षमता प्रागतिक राष्ट्रवादामध्ये असते.

iii. आक्रमक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ व दुरावा निर्माण करतो.

याचाच अर्थ, प्रागतिक राष्ट्रवाद नव्हे, तर आक्रमक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.

*३. **प्रसारवादी राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रवादाचा प्रकार आहे.**

**उत्तर:** बरोबर

**कारण:**

i. प्रसारवादी राष्ट्रवादामध्ये राष्ट्रे आक्रमक होतात व 'राष्ट्रीय गौरवासाठी' साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

ii. वसाहतवाद हे प्रसारवादी राष्ट्रवादाचे एक उदाहरण आहे, ज्यामध्ये राष्ट्र आक्रमकपणे दुसऱ्या राष्ट्राच्या भूप्रदेशावर अधिकार स्थापन करण्याचा प्रयत्न करते. उदा. भारतामध्ये ब्रिटिश वसाहतीची स्थापना.

म्हणूनच, प्रसारवादी राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रवादाचा प्रकार आहे.

*४. **सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार.**

**उत्तर:** बरोबर

**कारण:**

i. राष्ट्राचे स्वतंत्र निर्णय घेण्याचे अधिकार म्हणजे सार्वभौमत्व होय. राष्ट्र निर्णय घेण्यासाठी इतर कोणत्याही राष्ट्रावर अवलंबून नाही हे यातून दर्शवले जाते.

ii. सार्वभौम राष्ट्र आपल्या अधिकार क्षेत्राबाबत स्वत:चे निर्णय घेण्यास, कायदे बनवण्यास व शासन करण्यास स्वतंत्र असते.

iii. सार्वभौम राष्ट्राच्या जनतेला स्वयंनिर्णयाचा अधिकार असतो.

याचाच अर्थ, सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार होय.

५. **सार्वजनिक आणि खासगी दोन्ही संस्थांकडे राज्याच्या वतीने कार्य करण्याची अधिमान्यता आहे.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. सार्वजनिक संस्थांमध्ये शासनाच्या कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्यायमंडळ इत्यादी विविध घटकांचा समावेश होतो. धोरणनिर्मिती, कायदे करणे, निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी ही त्यांची जबाबदारी असते.

ii. दुसरीकडे खासगी संस्था या नागरी समाजाचा भाग असतात. यामध्ये खासगी व्यवसाय, मंडळे यांचा समावेश होतो.

iii. सार्वजनिक संस्थांनाच राज्याच्या नावे कार्य करण्याची अधिमान्यता असते.

#६. **राज्याला जनहितासाठी निर्णय घेण्याची अधिमान्यता असते.**

**उत्तर:** बरोबर

**कारण:**

i. राज्य ही जनतेच्या सर्वसामान्य गरजा पूर्ण करणारी राजकीय संस्था असते. सर्व नागरिक हे राज्याचे सदस्य असतात.

ii. राज्याची कार्ये शासनाच्या माध्यमातून होतात.

iii. राज्याच्या सरकारद्वारे हे निर्णय जनहिताच्या दृष्टीने घेतले जातात. निर्णय घेण्याच्या अधिकाराला अधिमान्यता असे म्हणतात.

म्हणूनच, राज्याला जनहितासाठी निर्णय घेण्याची अधिमान्यता असते.

*७. **पॅलेस्टाईन हे राज्य आहे.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. पॅलेस्टाईनच्या जनतेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेला (PLO) मान्यता आहे.

ii. त्यांनी गाझा आणि वेस्ट बँक हा प्रदेश पॅलेस्टाईनचा भूप्रदेश म्हणून जाहीर केला आहे.

iii. परंतु, पॅलेस्टाईनचे सार्वभौम सरकार नाही. हा प्रदेश इस्राएलच्या अधिकारक्षेत्रात येतो.

म्हणून, पॅलेस्टाईन हे राष्ट्र आहे; पण राज्य नाही.

[**टीप:** २०१२ पासून पॅलेस्टाईनला संयुक्त राष्ट्रांत 'सभासद नसलेला निरीक्षक' दर्जा देण्यात आला आहे. तसेच, संयुक्त राष्ट्रांच्या १०० हून अधिक राष्ट्रांनी पॅलेस्टाईनला राज्याचा दर्जा दिला आहे.]

Sample Content

**८. शासन कायस्वरूपी असते.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. शासन हे राज्याचा प्रतिनिधी म्हणून राज्याच्या संकल्पाला आकार देणे, व्यक्त करणे आणि प्रत्यक्षात आणण्याचे कार्य करते.

ii. शासनसंस्था ही निश्चित कालावधीसाठी असते व शासनव्यवस्थेत बदल होऊ शकतो.

iii. सरकार येते आणि जाते म्हणजेच ठरावीक काळानंतर नवीन सरकार निवडले जाते.

म्हणूनच, शासन कायमस्वरूपी नसते.

## प्र.४. सहसंबंध स्पष्ट करा.

**१. राष्ट्र आणि राष्ट्रवाद**

**उत्तर:**

i. राष्ट्र हा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीवर स्वत:ची समान ओळख असणाऱ्या, आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांचा गट असतो.

ii. राष्ट्रवाद ही राजकीय अस्मितेची भावना आहे. हे लोकांचे राष्ट्राप्रति प्रेम असते. लोक आपल्या राष्ट्राशी भावनिकरित्या जोडले जातात. आपल्या राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा त्यांच्यात निर्माण होते. ही लोकांमध्ये राष्ट्राप्रति राजकीय निष्ठेची भावना ठेवणारी शक्ती आहे.

iii. थोडक्यात राष्ट्र हे ऐक्याची भावना असलेल्या लोकांचा समूह आहे, तर राष्ट्रवाद हा एखाद्याच्या मातृभूमीद्वारे निर्माण होणारी ओळखीची भावना आणि राष्ट्राविषयक असलेला अभिमान आहे.

**२. राज्य आणि भूप्रदेश**

**उत्तर:**

i. जनतेच्या सामान्य गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण केलेली राजकीय संस्था म्हणजे राज्य होय. शासनाच्या माध्यमातून राज्यांची कार्ये केली जातात. राज्य हे हक्क प्रदान करते, न्याय देते, समानता ठेवते आणि स्वातंत्र्याची हमी देते.

ii. राज्याच्या सीमेंतर्गत असलेला भौगोलिक प्रदेश म्हणजेच भूप्रदेश होय. भूप्रदेशाचे तीन घटक असतात. यामध्ये राष्ट्रीय सीमेंतर्गत असलेली प्रत्यक्ष भूमी, किनारपट्टीलगतचा सागरी प्रदेश (किनारपट्टीपासून १२ नॉटिकल मैल) आणि आपल्या भूप्रदेशावरील आकाशाचा भाग यांचा समावेश असतो.

iii. राज्याला निश्चित भूप्रदेश असण्याची आवश्यकता असते. त्याला आपल्या भूप्रदेशात शासन करण्याचा कायदेशीर अधिकार असतो. या अधिकार क्षेत्राबाबात निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार राज्याला असतो.

**३. राज्य आणि शासनसंस्था**

**उत्तर:**

i. राज्य ही राजकीय संस्था आहे, ज्यामध्ये सर्व सार्वजनिक संस्था आणि नागरिकांचा समावेश होतो. ही अमूर्त संकल्पना आहे. दुसरीकडे शासनसंस्था राज्याचा भाग आहे आणि ती मूर्त स्वरूपाची असते.

ii. राज्य हे कायमस्वरूपी असते, तर शासनसंस्था निश्चित कालावधीसाठी असते. राज्य हे व्यक्तिनिरपेक्ष असते व ते राजकीयदृष्ट्या तटस्थ असते. दुसरीकडे शासनसंस्थेला विचारप्रणालीवर आधारित अजेंडा असतो. त्यानुसार त्यांना धोरणांची अंमलबजावणी करायची असते.

iii. राज्य हे सार्वभौम असते, तर शासन हे माध्यम आहे. ज्याद्वारे राज्य आपले अधिकार वापरते.

## प्र.५. आपले मत नोंदवा.

***१. भारत एक राज्य आहे.**

**उत्तर:**

i. भारताच्या संविधानाच्या सरनाम्यात 'सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक' असे शब्दप्रयोग आहेत.

ii. याचा अर्थ भारताला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे. म्हणजेच त्याला निर्णय घेण्यासाठी इतर कोणत्याही देशावर अवलंबून राहावे लागत नाही.

iii. भारत आपले स्वत:चे निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकते. तसेच, त्याला आपले कायदे करण्याचा आणि राज्य करण्याचा अधिकार आहे.

iv. भारत हे राजकीयदृष्ट्या स्वयंनिर्णय घेणारे राष्ट्र आहे. त्यामध्ये राज्याचे सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनव्यवस्था, भूप्रदेश आणि लोकसंख्या ही सारी वैशिष्ट्ये आहेत. म्हणूनच, भारत हे राज्य आहे.



**ज्ञानगुरू**

दक्षिण सुदान हे अधिकृतरित्या प्रजासत्ताक दक्षिण सुदान म्हणून ओळखले जाते, त्याला २०११ मध्ये सुदानपासून स्वातंत्र्य मिळाले. हे सर्वांत अलीकडील सार्वभौमत्व मिळालेले राज्य आहे. जुबा ही त्याची राजधानी आहे. येथे स्वातंत्र्यासाठी सार्वमताद्वारे मतदान घेण्यात आले.

Sample Content

**२. लोकसंख्या हा राज्याचा एक घटक आहे.**

**उत्तर:**

i. राज्य हा एक राजकीय समुदाय आहे, जो त्याच्या लोकांशिवाय असू शकत नाही.

ii. राज्याचे अस्तित्व सर्वच मानवी कृती म्हणजेच शिक्षण, संरक्षण, सामाजिक कल्याण, कायदा व सुव्यवस्था इत्यादी कार्यांद्वारे जाणवते.

iii. राज्यातील लोकांमध्ये भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक इत्यादी स्वरूपाची विविधता असू शकते.

iv. एखाद्या राज्यात अनेक राष्ट्रांचा समावेश असू शकतो. उदा. सोव्हिएट रशियात अनेक राष्ट्रीय लोक जसे- रशियन लिथुआनियन, लाटवियन, इस्टोनियन, युक्रेनियन इत्यादींचा समावेश होता.

**३. राज्य आणि शासनसंस्था या भिन्न संकल्पना आहेत.**

**उत्तर:**

i. सर्वसामान्य जनतेच्या गरजा भागवण्यासाठी निर्माण केलेल्या राजकीय संस्था म्हणजे राज्य होय.

ii. म्हणजेच, राज्याचा प्रतिनिधी म्हणून शासन राज्याच्या संकल्पाला आकार देणे, तो व्यक्त करणे आणि प्रत्यक्षात आणण्याचे कार्य करते.

iii. राज्याचे प्रशासन शासनामार्फत सांभाळणारी शासनसंस्थेची कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ ही तीन अंग आहेत.

याचाच अर्थ, राज्य आणि शासनसंस्था या भिन्न संकल्पना आहेत.

## प्र.६. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

***१. राष्ट्राची वैशिष्ट्ये कोणती आहेत?**

**उत्तर:** अर्नेस्ट बार्करच्या मते, एका निश्चित प्रदेशात जरी वेगवेगळ्या वंशांचे लोक असले तरी ऐतिहासिक परंपरेद्वारे समान विचार आणि भावना, समान धर्म आणि भाषा असलेले लोक म्हणजे राष्ट्र होय. राष्ट्राची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

**i. लोकसंख्या:** राष्ट्राला लोकसंख्या असणे आवश्यक असते. या लोकांमध्ये आपापसांत काही साम्य असते. हे साम्य भाषिक, वांशिक, धार्मिक असू शकते. तसेच, ते समान सांस्कृतिक अथवा ऐतिहासिक अनुभवाद्वारे येऊ शकते. या वांशिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ऐक्याच्या दृष्टिकोनातून आपण एक राष्ट्र आहोत हा समज निर्माण होतो.

**ii. सामुदायिक ऐक्याची भावना:** लोकांमधील सांस्कृतिक समानतेतून, आपण एक असल्याची मानसिकता निर्माण होते. हा भावनिक पातळीवरचा विचार आहे. हा त्या समुदायाचा दृष्टिकोन असतो.

**iii. राजकीय वेगळेपण:** एका निश्चित भूप्रदेशात राहणाऱ्या व सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक किंवा भाषिक समानता असलेल्या लोकांमध्ये आपण राजकीय पातळीवर वेगळे व्हावे ही भावना निर्माण होते. हे विचार स्वयंनिर्णयाच्या जाणिवेतून पुढे येतात. यातूनच राजकीय पातळीवरील स्वशासनाची मागणी निर्माण होऊ शकते.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

येथे स्वयंनिर्णय म्हणजे अशी प्रक्रिया ज्यामध्ये देश त्यांचे सार्वभौमत्व आणि राजकीय अस्तित्व बाह्य हस्तक्षेपाशिवाय स्वीकारतात.

***२. राष्ट्रवाद म्हणजे काय हे सांगून त्याचे विविध प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर:**

i. राष्ट्रवाद ही एक प्रकारची राजकीय अस्मिता असते. ते आपल्या राष्ट्रावरचे प्रेम असते. उदा. ब्रिटिश वसाहतवादाविरुद्ध भारताचा स्वातंत्र्यलढा हे भारताच्या राष्ट्रवादाचे उदाहरण आहे.

ii. राष्ट्रवाद ही अशी भावना आहे, जी लोकांना राष्ट्राशी मातृभूमीशी भावनिक पातळीवर जोडते.

iii. लोक आपल्या राष्ट्राच्या क्रिकेट टीमचा जयजयकार करतात, राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहतात किंवा युद्धादरम्यान आपल्या सेनादलाला पाठिंबा देतात तेव्हा हा राष्ट्रवाद दिसून येतो.

iv. **राष्ट्रवादाचे प्रकार**

**अ. उदारमतवादी राष्ट्रवाद:** उदारमतवादी राष्ट्रवादाचा उगम हा फ्रेंच राज्यक्रांतीत झाला. राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या 'चौदा मुद्द्यां' मध्ये देखील हा दिसून येतो. राष्ट्र आणि सार्वभौमत्वाची सांगड राष्ट्रवाद घालून देतो. प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचा अधिकार आहे. हे उदारमतवादी राष्ट्रवाद मानतो.

**ब. परंपरावादी राष्ट्रवाद:** हा राष्ट्रवाद समाजाला अंतर्मुख करणारा आहे. राष्ट्र आणि समाज यांचे संबंध अतिशय जवळचे आहेत असे हा राष्ट्रवाद मानतो. स्वदेशाभिमानाला हा राष्ट्रवाद खूप महत्त्व देतो.

**क. प्रसारवादी राष्ट्रवाद:** प्रसारवादी राष्ट्रवाद हा आक्रमक स्वरूपाचा असतो. राष्ट्रीय गौरवासाठी राष्ट्रे आक्रमक होऊन साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. वसाहतवाद हे आक्रमक राष्ट्रवादाचे उदाहरण आहे.



Sample Content

ड. **वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद:** हा राष्ट्रवाद राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यासंदर्भात पाहिला जातो. भारताने स्वातंत्र्य लढ्याच्या काळात या प्रकारच्या राष्ट्रवादाचा अनुभव घेतला आहे.

**३. राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये कोणती आहेत?**

**उत्तर:** राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

**i. ऐक्य निर्माण करू शकणारी किंवा विनाश करू शकणारी शक्ती:** राष्ट्रवाद ही अशी शक्ती आहे, जी एकता निर्माण करू शकते, तसेच ती एखाद्या गोष्टीचा नाशदेखील करू शकते. राष्ट्रवाद प्रागतिक किंवा आक्रमक स्वरूपाचा असू शकतो. प्रागतिक राष्ट्रवाद समाजाला एकत्रित करून विकास साध्य करू शकतो. आक्रमक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.

**ii. स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार करतो:** राष्ट्रवाद हा साम्राज्यवाद किंवा वसाहतवादविरोधी असतो. कोणत्याही क्षेत्रावर परकीय ताबा असण्याच्या विरोधात असणे हे राष्ट्रवादाचे एक वैशिष्ट्य आहे. जगातील स्वातंत्र्याचे लढे या संकल्पनेतून निर्माण होताना दिसून येतात. अशाप्रकारे, राष्ट्रवाद स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार करतो.

**iii. विविधतेला प्रोत्साहन देतो:** राष्ट्रवाद विविधतेला प्रोत्साहन देऊ शकतो. भारतात धार्मिक, वांशिक, भाषिक, प्रादेशिक इत्यादींची विविधता दिसून येते; मात्र या विविधतेतही भारतीय जनतेत एकता दिसून येते. 'विविधतेत एकता' हा भारताच्या राष्ट्रवादाचा गाभा आहे.

**४. राज्याचा अर्थ, व्याख्या आणि भूमिका स्पष्ट करा.**

**उत्तर:**

**i. अर्थ:**

अ. राष्ट्राची सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनसंस्था, भूप्रदेश आणि लोकसंख्या ही वैशिष्ट्ये त्याला राज्य बनवतात.

ब. राष्ट्राच्या राजकीय स्वयंनिर्णयाच्या इच्छेमुळे ते राज्य बनण्याकडे वाटचाल करते.

**ii. व्याख्या:**

अ. ॲरिस्टॉटल: राज्य हा परिपूर्ण आणि स्वावलंबी आयुष्य असलेल्या कुटुंबांचा आणि खेड्यांचा संघ असतो. यात आनंदी आणि प्रतिष्ठित आयुष्य असणे अपेक्षित आहे.

ब. जॉं बोडीन: राज्य हे कुटुंबांचे असे संघटन आहे, की ज्यात कुटुंबे आणि त्यांच्या मालकीची साधने सर्वोच्च शक्तीने, तसेच तर्काने शासित असते.

क. वुड्रो विल्सन: एका विशिष्ट भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटित केलेले लोक म्हणजे राज्य होय.

ड. हॅरॉल्ड लास्की: वाटून दिलेल्या भौतिक क्षेत्रात, सर्व संस्थांवर श्रेष्ठत्वाचा दावा करणारे लोक आणि शासन यांत विभागलेला भूप्रदेशात्मक समाज म्हणजे राज्य होय.

**iii. भूमिका:**

अ. जवळपास सर्व मानवी कृती जसे- शिक्षण, संरक्षण, सामाजिक कल्याण, कायदा व सुव्यवस्था इत्यादी कार्यांद्वारे राज्याचे अस्तित्व जाणवते.

ब. तसेच, जन्म-मृत्यूची नोंदणी, पॅनकार्ड किंवा आधारकार्ड मिळवणे, लग्नाची नोंदणी यांसारखी वैयक्तिक कार्येदेखील राज्यातर्फे केली जातात.

क. राज्य हे हक्क प्रदान करते, न्याय देते, समानता ठेवते आणि स्वातंत्र्याची हमी देते.

**प्र.७. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

***१. राज्याचे खालील घटक स्पष्ट करा.**

**i. सार्वभौमत्व** **ii. शासनसंस्था**

**iii. लोकसंख्या** **iv. भूप्रदेश**

**उत्तर:**

i. अ. सार्वभौमत्व म्हणजे राष्ट्राचा स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार होय. जे राज्य कायदेशीरदृष्ट्या सार्वभौम असते, त्याला स्वत:चे संविधान असते. सार्वभौमत्व हा शब्द स्वातंत्र्य या शब्दाऐवजीदेखील वापरला जातो.

ब. सार्वभौमत्व हा कायद्याच्या चौकटीतील शब्द आहे, तर स्वातंत्र्य या शब्दाचे स्वरूप राजकीय आहे. उदा. भारताला राजकीय स्वातंत्र्य १९४७ साली मिळाले; मात्र १९५० मध्ये संविधान अंमलात आल्यानंतर ते सार्वभौम राज्य बनले.

ii. अ. प्रत्येक सार्वभौम राज्याची सार्वभौम व स्वतंत्र शासनसंस्था असावी लागते. उदा. जेव्हा भारत ब्रिटिशांची वसाहत होता, तेव्हा भारतात शासनसंस्था होती; मात्र ती सार्वभौम स्वतंत्र शासनसंस्था नव्हती. म्हणूनच, स्वातंत्र्यापूर्वी भारत हे राज्य नव्हते.

ब. राज्याच्या संस्था या 'सार्वजनिक' संस्था असतात. ज्यामध्ये कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्यायमंडळ, नोकरशाही इत्यादी घटकांचा समावेश होतो.

क. धोरणनिर्मिती, कायदे करणे, निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी ही जबाबदारी सार्वजनिक संस्थांची असते.

Sample Content

iii. अ. जनता हे राज्याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

ब. लोकांमध्ये भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक इत्यादी स्वरूपाची विविधता असू शकते.

क. याचाच अर्थ एका राज्यात अनेक 'राष्ट्रे' असू शकतात. उदा. युनायटेड किंग्डममध्ये इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि आयर्लंडमधील लोकांचा समावेश होतो.

iv. अ. राज्याचा सीमांतर्गत भौगोलिक प्रदेश म्हणजे भूप्रदेश होय. राज्याला निश्चित भूप्रदेश असणे आवश्यक असते.

ब. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार असतो, त्याला अधिकार क्षेत्र असे म्हणतात. राज्याला अधिकार क्षेत्राबाबत निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार असतो.

क. भूप्रदेशाचे राष्ट्रीय सीमांतर्गत असलेली प्रत्यक्ष भूमी, किनारपट्टीलगतचा सागरी प्रदेश आणि भूप्रदेशावरील आकाशाचा भाग असे तीन घटक असतात.

## ज्ञानाचे उपयोजन

[टीप: उपक्रमांची उत्तरे व्यक्तिनिष्ठ असू शकतात. दिलेली उत्तरे केवळ संदर्भासाठी आहेत. विद्यार्थ्यांनी हे उपक्रम स्वत: करणे अपेक्षित आहे.]

१. **चर्चा करा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४)

जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकातील 'भारतमाता' आणि 'भारतातील विविधता आणि एकता' ही प्रकरणे वाचा. नेहरूंच्या लिखाणाच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादावर चर्चा करा.

(विद्यार्थ्यांनी हा उपक्रम ग्रंथालयाच्या साहाय्याने स्वत: करणे अपेक्षित आहे.)

२. **करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ६)

राष्ट्र आणि राज्याच्या वैशिष्ट्यांमधील समानता आणि फरक दाखवणारा तक्ता तयार करा.

**उत्तर: फरक**

i. सामाजिक, सांस्कृतिक राजकीय ओळख असणारा आणि स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करण्याची इच्छा असलेल्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र होय.

ii. लोकांच्या सामान्य गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण केलेली राजकीय संस्था म्हणजे राज्य होय.

**समानता**

i. राजकीय स्वयंनिर्णयाची इच्छा हे राष्ट्र आणि राज्य या दोन्हींमधील समान वैशिष्ट्य आहे.

ii. राष्ट्रामध्ये निश्चित भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये असलेली समानता स्वयंनिर्णयाच्या इच्छेला आणि राजकीय स्वातंत्र्याला जन्म देते.

iii. जेव्हा सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनसंस्था, निश्चित भूप्रदेश आणि लोकसंख्या ही वैशिष्ट्ये असतात, तेव्हा 'राष्ट्र' हे 'राज्य' बनते.

## उपक्रम

*१. **सर्वांत लहान भूप्रदेश व सर्वांत मोठा भूप्रदेश असलेली राज्ये जगाच्या नकाशा आराखड्यात दर्शवा.**

**उत्तर:**

i. सर्वांत लहान भूप्रदेश असलेली राज्ये: व्हॅटिकन सिटी, मोनाको, प्रजासत्ताक नौरू, तुवालु, सॅन मारिनो प्रजासत्ताक इत्यादी.

ii. सर्वांत मोठा भूप्रदेश असलेली राज्ये: रशिया, कॅनडा, चीन, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ब्राझील इत्यादी.

[टीप: सदर उपक्रमाकरता विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील जग-राजकीय (प्रमुख देश) या नकाशाचा वापर करू शकतात.]

## सराव चाचणी

**वेळ: १.३० तास** **एकूण गुण: २५**

**प्र.१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[३]**

१. सार्वभौमत्वाची मागणी म्हणजे _______ हक्काची मागणी होय. (मत, राष्ट्रीयत्व, स्वयंनिर्णय, राष्ट्रवाद)

२. _______ यांनी 'चौदा मुद्द्यांची' मांडणी केली. (वुड्रो विल्सन, ॲरिस्टॉटल, जाँ बोडीन, हॅरॉल्ड लास्की)

३. इंग्रजीतील Nation हा शब्द लॅटिन शब्द _______ पासून निर्माण झाला आहे. (Nasci, Natio, Natalis, Nauto)



Sample Content

**प्र.२. दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.** **[२]**

१. लोकांना देशाशी राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती.

२. पॅलेस्टाईनच्या जनतेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून मान्यता असलेली संघटना.

**प्र.३. आपले मत नोंदवा. (कोणतेही एक)** **[४]**

१. राज्य आणि शासनसंस्था या भिन्न संकल्पना आहेत.

२. भारत एक राज्य आहे.

**प्र.४. सहसंबंध स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** **[६]**

१. राज्य आणि शासनसंस्था

२. राष्ट्र आणि राष्ट्रवाद

३. राज्य आणि भूप्रदेश

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **[१०]**

१. राष्ट्रवाद म्हणजे काय? त्याचे प्रकार स्पष्ट करा.

२. राष्ट्राची वैशिष्ट्ये कोणती आहेत?

३. राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये कोणती आहेत?

Sample Content

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

## AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

### SCIENCE

**Perfect Series:**

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

**Precise Series:**

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

**Additional Books for Std. XII Sci. & Com.:**

- A collection of Board Questions (PCMB)
- 20 Model Question Papers with solutions (PCMB & E)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)

### COMMERCE (ENG. & MAR. MED.)

**Smart Notes:**

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

### ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for **MHT-CET, NEET & JEE**

**Languages:**

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

**OUR PRODUCT RANGE**

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

**Visit Our Website**

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of **STATIONERY**